## ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

ग्रामीण नळ योजनांसाठी दरडोई खर्चाची प्रमाणके.

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्रमांक: ग्रापापु- १०९५/सीआर-११२४./पा. पु.०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक:- १६ मे, १९९६.

वाचा:- [१] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु-१०९२/सीआर- ४४५/३९-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२.

[२] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापू-१०९५/सीआर-१०७५/३९-अ, दिनांक १३ नोव्हेंबर, १९९५.

[३] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:- डोविका-१०८९/प्र.क्र. ६६/योजना-११, दिनांक २३ नोव्हेंबर, १९९०.

[४] शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक:डोविका-१०९४/प्र.क्र. ३६/का. १४५५, दिनांक २७ सप्टेंबर, १९९४.

<u>प्रस्तावना</u>:- अनुक्रमांक-१ येथे नमुद केलेल्या दिनांक ३ नोव्हेंबर, १९९२ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरावरील तसेच स्थानिक स्तरावरील मंजुर करावयाच्या ग्रामीण नळपाणीपुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाची प्रमाणके विहित करण्यात आली होती. त्यानंतर अ.क्र. २ येथे नमुद केलेल्या शासन निर्णयान्वये दररोज/दरडोई ४० लिटर याप्रमाणे करण्यात येणा-या पाणी पुरवठ्यात दररोज/दरडोई ५५ लिटर पर्यंत वाढ करण्यात आली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत ग्रामीण नळ योजनांसाठी लागणारी साहित्य सामुग्री व मजुरीच्या दरात झालेली भाववाढ लक्षात घेता उपरोक्त [१] प्रमाणे ३ नोव्हेंबर, १९९२ मध्ये विहित केलेली दरडोई खर्चाची प्रमाणके सुधारीत करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u>:- ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत माणशी/दिवशी ५५लिटर्स या प्रमाणात ग्रामीण नळपाणी पुरवठा योजना आखाव्यात व या योजनांमध्ये गावातील जास्तीत जास्त ३० टक्के पर्यंत घरांना खाजगी जोडण्या घ्याव्यात, खाजगी नळ जोडणी धारकांना दररोज/दरडोई ७० लिटर प्रमाणे व उर्वरित ७० टक्के घरांना दररोज/दरडोई ४० लिटर प्रमाणे सार्वजनिक नळांद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, या शासनाच्या निर्णयानुसार दरडोई खर्चाची प्रमाणके या निर्णयाच्या दिनांकापासून खालील निर्देशिल्याप्रमाणे राहतील, असे आदेश शासन देत आहे. :-

| क्षेत्र | दरडोई खर्चाची कमाल मर्यादा: |
| --- | --- |
| अ] कोकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी. | |
| १] निर्देशित डोंगरी भाग. | रु. २१२०/-. |
| २] ३० मीटर्सपेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रु. १७९०/- |
| ३] ३० मीटर्सपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रु. १३९०/- |
| ब] कोकण क्षेत्रासाठी. | |
| १] निर्देशित डोंगरी भाग. | रु. २३३०/- |
| २] ३० मीटर्सपेक्षा जास्त स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रु. १९७०/- |
| ३] ३० मीटर्सपर्यंत स्टॅटीक लिफ्ट असलेल्या नळ योजना. | रु. १५३०/- |

२. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-२०३/व्यय-१५, दिनांक १७ एप्रिल, १९९६ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ र. न. देशमुख ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] मा. राज्यपालांचे सचिव.
२] मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३] मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
४] सर्व मंत्र्यांचे/राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
५] सर्व विभागीय आयुक्त.
६] सर्व जिल्हाधिकारी.



१६

७] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

८] सदस्य सचिव, म.पा.पु.व ज.नि.मंडळ, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१.

९] मुख्य अभियंता [ग्रामीण], म.पा.पु.व ज.नि.मंडळ, श्रेयस चेंबर्स, मुंबई-१. [७० अतिरिक्त प्रतींसह संबंधित अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यासाठी.

१०] संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

११] भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व उपसंचालक. [प्रत्येकी ७ अतिरिक्त प्रतींसह त्यांच्या क्षेत्रातील वरिष्ठ भूवैज्ञानिकांना पाठविण्यासाठी].

१२] महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र/१, मुंबई.

१३] महालेखापाल, [लेखा परिक्षा] महाराष्ट्र-१, मुंबई.

१४] महालेखापाल, [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र-२, नागपूर.

१५] महालेखापाल, [लेखा परिक्षा] महाराष्ट्र-२, नागपूर.

१६] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, [२५ अतिरिक्त प्रतींसह त्यांच्या क्षेत्रातील संबंधितांना पाठविण्यासाठी].

१७] नियोजन विभाग/वित्त विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग/महसूल व वन विभाग/नगर विकास विभाग/आदिवासी विकास विभाग.

१८] विशेष कार्य अधिकारी, [श्री.माने], पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

१९] उपसचिव, श्रीमती मालिनी शंकर, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

२०] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

२१] निवड नस्ती, [पा.पु.०७] पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

जोव्हीका/२१५९६.